ग्रामविकास विभागाच्या वेबसाईटसाठी मजकूर पुनर्विलोकन समिती गठीत करणे तसेच वेब माहिती व्यवस्थापक नेमणे बाबत.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
शासन आदेश क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.१०/माहिती तंत्रज्ञान कक्ष
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दिनांक: ०९ एप्रिल, २०१८

आदेश :

शासनाच्या वेबसाईटचे नियमितपणे परीक्षण करणे, त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे आणि वेबसाईटवरील माहिती अद्ययावत आहे किंवा नाही याची तपासणी करणे यासाठी प्रत्येक विभागाने मजकूर पुनर्विलोकन समिती गठीत करण्याचे तसेच वेब माहिती व्यवस्थापक म्हणून उप सचिव/ सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे निर्देश आहेत.

२. माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या उपरोक्त निर्देशांस अनुसरून संकेतस्थळाच्या व्यवस्थापन व देखभालीसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने नेमलेल्या मे. महाआयटी या संस्थेच्या तंत्रज्ञांशी समन्वय व सहाय्य करण्यासाठी तसेच ग्रामविकास विभागाच्या rdd.maharashtra.gov.in या वेबसाईटच्या GIGW,Accessibility, W3C, WCAG इ. मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे, वेब माहिती व्यवस्थापकाला मार्गदर्शन व सूचना करणे इत्यादीसाठी खालीलप्रमाणे मजकुर पुनर्विलोकन समिती (Content Review Committee) गठीत करण्यात येत आहे.

मा. सचिव (ग्रामविकास)	- अध्यक्ष
राज्य माहिती अधिकारी (राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र) यांचे प्रतिनिधी	- सदस्य
उप सचिव (सर्व), ग्रामविकास विभाग	- सदस्य
ग्रामविकास विभागाचे ई-गव्हर्नन्स सल्लागार	- सदस्य
सह संचालक (आर्थिक सेवा), ग्रामविकास विभाग	- सदस्य सचिव

३. सदर समिती ग्रामविकास विभागाच्या rdd.maharashtra.gov.in या वेबसाईटच्या संनियंत्रण व मजकूर पुनर्विलोकनाचे काम करेल. तसेच या वेबसाईटसाठी **वेब माहिती व्यवस्थापक (WIM) म्हणून सह संचालक (आर्थिक सेवा)** यांची आणि **संगणक समन्वयक म्हणून कक्ष अधिकारी, माहिती तंत्रज्ञान कक्ष** यांची नियुक्ती करण्यात येत आहे. मजकूर पुनर्विलोकन समितीने दिलेल्या सूचना व शिफारसींची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ते पार पडतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०१२४५२३५४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj R Deshpande

Digitally signed by Saroj R Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=R D D, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj R Deshpande
Date: 2018.04.10 13:51:13 +05'30'

(सरोज राजेश देशपांडे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), मंत्रालय, मुंबई
२) मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई.
३) राज्य माहिती अधिकारी (राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र), ११ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
४) उप सचिव (सर्व), ग्रामविकास विभाग, मुंबई
६) ग्रामविकास विभागातील ई-गव्हर्नन्स विषयक सल्लागार,मुंबई.
७) सह संचालक (आर्थिक सेवा), ग्रामविकास विभाग, मुंबई.
८) कक्ष अधिकारी, माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, मुंबई.
९) निवड नस्ती, कार्यासन-माहिती तंत्रज्ञान कक्ष,ग्रामविकास विभाग, मुंबई.